# मिलिंद म्हामल यांचे कथालेखन

**मु**क्तीनंतरच्या काळात गोमंतकातील मराठी साहित्यनिर्मितीला अनेक अंगांनी बहर आलेला असला तरी कथेच्या क्षेत्रात हा बहर विशेषत्वाने नजरेत भरण्यासारखा आहे. संपूर्ण मराठी कथेच्या विकासावरच प्रभाव पाडणारा वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरेदसाई किंवा पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्यासारखा एखादा दिग्गज गोमंतकीय कथाकार या काळात उदयाला आलेला आहे कां? असा प्रश्नही कदाचित् उपस्थित करता येऊ शकेल. पण जेव्हा लिहिणाऱ्यांची संख्या भरघोस असते आणि कथा विविधांगांनी समृध्द होत असते, अशावेळी एक-दोन कथाकारांची नावे अधोरेखित करणे सोपे नसते हे ही लक्षात घ्यावे लागते. मुक्तीनंतरची गोमंतकीय कथा विविध रूपांनी कशी समृध्द होत आहे हे सहजपणे ध्यानात येऊ शकते. मराठी नवकथेला वेगळे परिमाण देणारे नरेश कवडी एकीकडे खास उपरोधिक बाजाची वैशिष्ट्यपूर्ण कथा लिहून गोमंतकीय कथेत भर घालतात तर दुसरीकडे आशयसंपन्न वास्तववादी कथा लिहिणारे अरूण हेबळेकर विज्ञानकथेचा प्रवाह गोमंतकीय कथेत निर्माण करतात. विठ्ठल ठाकूरांनी रूपकात्मक, स.शं. देसाई यांनी ऐतिहासिक तर सुभाष भेंडे, विजय कापडी यांनी विनोदी कथेचे दालन समृध्द केलेले आहे. या काळातील गोमंतकीय कथेत स्त्री-लेखिकांचा सहभागही लक्षवेधक आहे. स्त्री दुःखाचे आणि स्त्रियांच्या भावबंधाचे चित्रण करणाऱ्या वासंती नाडकर्णी, रेखा मिरजकर, अंजली आमोणकर, मीना समुद्र, मीलन तळावलीकर इ. अनेक लेखिकांनी गोमंतकीय कथेच्या समृध्दीला हातभार लावलेला आहे. गेल्या काही वर्षात चंद्रकांत गावस, विठ्ठल गावस, गजानन मांद्रेकर, सु. म. तडकोड, नारायण महाले, ना. बा. रणसिंग अशा अनेक लेखकांनी दर्जेदार आणि वैविध्यपूर्ण कथा लिहून गोमंतकीय कथेची समृध्दता वाढवलेली आहे. अशा लेखकांमध्ये मिलिंद म्हामल हे जाणकार वाचकांचे लक्ष आवर्जून वेधून घेईल असे महत्त्वाचे नाव आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कथालेखनाने

गोमंतकीय मराठी कथेवर स्वतःची नाममुद्रा उमटविण्याचे सामर्थ्य या कथाकारामध्ये आहे याची खात्री त्यांच्या कथा वाचल्यावर पटते. आजच्या गोमंतकीय मराठी कथेचा विचार म्हामलांच्या कथेची दखल घेतल्याशिवाय पूर्ण होणारच नाही असेही निश्चितपणे म्हणता येते.

गोव्यातील विविध नियतकालिकांतून, विशेषांकांतून, दिवाळी अंकांतून वाचकांच्या भेटीला येणारी मिलिंद म्हामल यांची कथा आता 'चतुर्थी' च्या रूपाने संग्रहित होत आहे. म्हामल यांच्यासारख्या कथाकाराच्या कथा पुस्तकरूपाने एकत्रितपणे वाचकांसमोर येणे ही गोष्टही महत्वाची ठरते.कारण अनेक वेळा चांगली, दर्जेदार कथा लिहिणाऱ्या लेखकांच्या कथांना पुस्तकरूपाने प्रकाशित होण्याचे भाग्य लाभतेच असे नाही. त्यामुळे चांगली कथा आणि कथालेखकही दुर्लक्षित रहातात. साहित्यक्षेत्रातील त्यांच्या कामगिरीचे योग्य मूल्यमापन होत नाही. मिलिंद म्हामल यांची कथा संग्रहरूपाने आल्यामुळे त्यांच्या कथालेखनाचे स्वरूप सामग्र्याने न्याहाळणे, या कथेचे विशेष लक्षात घेणे सहज आणि सोयीचे झालेले आहे.

'चतुर्थी' मध्ये मिलिंद म्हामल यांच्या बारा कथा संग्रहित झालेल्या आहेत. यातील काही कथा कथा-स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळवणाऱ्याही आहेत. अर्थात पारितोषिक मिळवणे हा साहित्यकृतीच्या श्रेष्ठत्वाचा किंवा गुणवत्तेचा निकष नेहमीच मानता येतो असे नाही. स्वतः म्हामलही तसे मानत नसतीलच. पण तरीही पारितोषिक मिळविणे - विशेषतः गोमंतक मराठी अकादमीसारख्या प्रतिष्ठाप्राप्त संस्थेच्या कथा-स्पर्धेत पारितोषिक मिळवणे हे कथेच्या दर्जेदारपणाचे सूचक आहे असे निश्चितच म्हणता येते. 'चतुर्थी' मधल्या पारितोषिकप्राप्त कथांप्रमाणेच इतर अनेक कथाही आशयसंपन्न आणि यशस्वी म्हणून लक्षवेधक ठरणाऱ्या आहेत.

मराठी कथेच्या क्षेत्रात ऐतिहासिक ठरलेल्या 'सह्याद्रिच्या पायथ्याशी' या कथासंग्रहाला वि. स. सुखटणकर यांनी 'कालचा व आजचा गोमंतक' असे आशयसूचक पर्यायी शीर्षक दिलेले आहे. त्याच पध्दतीने सांगायचे झाले तर मिलिंद म्हामल यांच्या कथा आजच्या गोमंतकाचे चित्रण करणाऱ्या कथा आहेत. आजच्या सर्वसामान्य गोमंतकीय माणसांचं जगणं, त्यांच्या व्यथा आणि संघर्ष, आजच्या गोमंतकीय जीवनाचे बदलते स्वरूप, या बदलाचे माणसाच्या जगण्यावर होणारे परिणाम, बदलांना सामोरे जाताना माणसांची होणारी भावनात्मक ओढाताण याचं दर्शन म्हामल यांच्या कथा वास्तववादी शैलीतून घडवतात. भोवतालच्या जीवनात घडणाऱ्या घटना, व्यक्ती यातूनच म्हामल यांच्या कथांची आशायसूत्रे साकार होत जातात. गोमंतकीय, शहरी किंवा पांढरपेशा जीवनाचे चित्रण करण्यापेक्षा बहुतांश कथांतून गावातल्या किंवा वाड्यावरल्या जीवनाचे चित्रण करण्यात लेखकाला अधिक रस आहे. 'ग्रामीण कथा' अशा ढोबळ नावाने या कथांचे वर्णन करता येणार नाही. पण गावातील जीवनशैली

गावच्या माणसाची जीवनसंवेदना बहुतांश कथांच्या आशयाचा गाभा आहे. समाजातल्या उच्चभ्रू, प्रतिष्ठीत व्यक्तींपेक्षा सामान्य माणसांच्या जगण्याविषयी, त्यांच्या सुखदुःखाविषयी लेखकाला कुतूहल आहे. म्हणून शेता-भाटात राबणारी, लाकूड गिरणीत काम करणारी, गवंडीकाम करणारी, पर्यटकांसाठी उभारलेल्या शॅक्समधून काम करणारी, टॅक्सी चालवणारी, कुवेतसारख्या देशात मिळालेला रोजगार अचानक सुटल्यामुळे सैरभैर झालेली अशी नाना प्रकारची माणसे जशी या कथांचा विषय होतात, त्याचप्रमाणे कर्तृत्त्वशून्य पतीच्या पुरुषी अहंकाराखाली दबलेल्या स्त्रियांची दुःखेही कथारुपाने साकार होतात.

मानवी जीवनातल्या सुखानुभवापेक्षा माणसाची दुःखे, त्याचा जीवनसंघर्ष हेच चांगल्या साहित्यनिर्मितीला प्रेरणा देत असतात. पण त्यासाठी लेखकाजवळ मानवी सहानुभाव असावा लागतो. एक लेखक म्हणून मिलिंद म्हामल यांच्याकडे अशी सहानुभावी दृष्टी आहे. म्हणूनच व्यक्तिची दुःखे त्यांच्या अनेक कथांचे चित्रणविषय झालेली आहेत. माणसाची दुःखे नानापरीची असतात, पण बरीचशी दुःखे कौटुंबिक पातळीवरची, कौटुंबिक संघर्षातून निर्माण झालेली असतात. रक्ताने जोडलेल्या नात्यात अंतर पडू लागले की एकाच कुटुंबातली माणसे परस्परांच्या दुःखाला कारणीभूत होतात. माणसाची आत्मकेंद्रीतता, स्वार्थीप्रवृत्तीही अशा कौटुंबिक संघर्षाला कारणीभूत होत असते. वडील-मुलगा, भाऊ-भाऊ यांच्यातील संघर्ष किंवा सासू-सूना, नणंद - भावजया यांच्यातील हेवेदावे ही कौटुंबिक संघर्षाची रूपे परंपरेने चालत आलेली दिसतात. अशा कौटुंबिक संघर्षामुळे दुःखी, एकाकी झालेल्या माणसांचे, कौटुंबिक नात्यात निर्माण होणाऱ्या दुराव्याचे चित्रण या संग्रहातील 'चतुर्थी' आणि 'घर' या कथांतून काहीसे विस्ताराने झालेले आहे. सदा आणि शिवराम यांच्यातील भाऊबंदकीचे चित्रण हा 'चतुर्थी' कथेचा मुख्य आशय आहे. कृषीसंस्कृतीत वाढलेल्या सरळ, प्रामाणिक पण अशिक्षित सदाला पोर्ट ट्रस्टमध्ये नोकरी करून गावी परत आलेला त्याचा भाऊ शिवराम लोभीवृत्तीने फसवत जातो. वडिलोपर्जित घरातून सदाला बाहेर पडावे लागते. मनात नसतानाही डोंगरची जमीन विकायला संमती द्यावी लागते. जमीन विकून आलेल्या पैशाच्या बळावर सदाच्या मुलाला नोकरी मिळते. नोकरी मिळालेला मुलगा लग्न झाल्यावर गावच्या मातीला, वडिलांना विसरतो. चवथीला झिला-सूनेच्या हातून पूजा करून घरात गणेशाची प्रतिष्ठापना करण्याची सदाची इच्छा मुलगा-सून न आल्यामुळे अपुरीच रहाते. भावाने केलेल्या फसवणूकीपेक्षा मुलाच्या या वागण्याचा आणि भावाच्या ईर्ष्येने स्वतःच्या घरी चतुर्थीही साजरी करता न आल्याचा धक्का सदाला जास्त बसतो. आपण हरलो असे वाटून तो आतून कोसळतो. कौटुंबिक नात्यातील दुराव्याचे चित्रण वास्तवदर्शी पध्दतीने या कथेतून तरी येतेच, पण पारंपरीक ग्रामसंस्कृतीत विशिष्ट मूल्ये आणि श्रध्दा घेऊन वाढलेल्या

माणसाची आजच्या अर्थकेंद्रीत जीवनप्रवृत्तीमुळे कशी मानसिक शोकात्मिका होते हे ही प्रभावीपणें दाखवले जाते, त्यामुळे ही कथा महत्त्वाची वाटते.

कौटुंबिक नात्यातील ताणतणावाचे चित्रण 'घर' या कथेतूनही येते. शारीरिक अधूपणामुळे अविवाहित रहावे लागलेल्या आपाने आपली सगळी कमाई वडील भावाच्या कुटुंबासाठीच खर्च केलेली आहे. पण अपघाताने आपा परावलंबी बनल्यावर त्याला आधार द्यायला भावाचे कुटुंब नाराज असते. त्यामुळे त्याला काही दिवस बहिणीच्या घरी रहावे लागते. पण त्याचे रहाणे बहिणीच्या कुटुंबालाही अडचणीचे वाटू लागल्याने त्याला तेथूनही बाहेर पडावे लागते. भावाच्या आणि बहिणीच्याही घरात आधार मिळत नसल्याने स्वतःचे वेगळे घर बांधण्याची वेळ येते. घर बांधण्यासाठी हक्काची जागा मिळवण्यासाठीही यातायात करावी लागते. शेवटी घर बांधत असतानाच आपाचा एके दिवशी मृत्यू होतो. आपानंतर त्याचा भाचा दिनू तेथे बांधून राहू लागतो. पण दिनूचे लग्न होऊन पाच वर्षे झाली तरी मूल न होण्याचे कारण आपाचे सान्निध्य असे घाड्याने सांगितल्याने घरात आपाचे नामोनिशाणही नको म्हणून फर्निचरसह आपाच्या सर्व वस्तू नदीत फेकून दिल्या जातात. 'घर' कथेतला हा कौटुंबिक संघर्ष तसा प्रातिनिधीकच आहे. आपाची उपेक्षा आणि त्याचे एकाकीपण वाचकाला अस्वस्थ करणारेच आहे. पण असा अस्वस्थतेचा अनुभव ही कथा फारशी देत नाही. कारण कथेचा प्रारंभ वाचकाला कथेच्या अनुभवविश्वात ओढून नेणारा असला तरी बाकीची कथा निव्वळ वृत्तांतकथनाच्या पद्धतीने सांगितले जाते. त्यामुळे आपाची व्यथा 'अनुभव' म्हणून साकारच होत नाही. या तुलनेत 'चतुर्थी' ही कथा एका गावकाराच्या मानसिकतेचे चित्रण करणारी म्हणून अधिक प्रभावी व यशस्वी वाटते.

'थोरली', 'शेकडेकारनीचे पांडव' या कथांतून मिलिंद म्हामल स्त्रीच्या दुःखाचे चित्रण करतात. 'सोबती' ही कथाही स्त्री-केंद्रीत कथा आहे. 'गोलकारनीचा कुवेटकार' या कथेचा आशय केवळ स्त्री चित्रणात्मक नसला तरी या कथेची रचनाही स्त्री-पात्राला केंद्रस्थानी ठेवून झालेली आहे. स्त्रियांच्या व्यथा-वेदनांचे यथार्थ चित्रण केवळ स्त्री-लेखिकाच साहित्यातून समर्थपणे करु शकतात असे नाही. मराठीत स्त्री-प्रश्नांची प्रभावीपणे मांडणी करणाऱ्या अनेक चांगल्या साहित्यकृती पुरुष-लेखकांनीच निर्माण केलेल्या आहेत. ह. ना. आपटे, श्री. व्यं. केतकर, उद्धव शेळके यासारख्या काही लेखकांचा या दृष्टीने आवर्जून उल्लेख करता येईल. मानवी सहानुभाव असणारा कोणताही पुरुष-लेखक स्त्रींच्या दुःखांचा वेधही समर्थपणे घेऊ शकतो, हे 'थोरली' किंवा 'शेकडेकारनीचे पांडव' या कथा वाचल्यानंतर सहज लक्षात येते. कर्तृत्वशून्य नवऱ्याची अरेरावी आणि मुलीपेक्षा मुलगा श्रेष्ठ मानण्याचा समाजाचा रूढ दृष्टिकोण शेकडेकारनीच्या दुःखाला कारण ठरलेले आहे. शेकडेकारनीच्या कर्तृत्वशून्य नवऱ्याला-

पांडुरंगला संसाराची जबाबदारी पेलता न आल्याने आणि त्याच्या दारु-जुगाराच्या व्यसनाने शेकडेकारनीचा संसार उध्वस्त झालेला आहे. दुर्दैवाने तिला पाठोपाठ मुलीच होत असल्याने नवऱ्याकडून शिवी-गाळ आणि मारहाण हेच तिचे पतीसौख्य बनते. आपणास मुलगा होऊन नवऱ्याच्या त्रासातून आपली सुटका व्हावी म्हणून प्रतिव्रतेला न शोभणारे पापही तिला करावे लागते. पांडूच्या मृत्युनंतर संसाराची सगळी जबाबदारी ती हिंमतीने पेलते. वाढत्या वयाच्या मुली दिसायला सामान्य असल्याने अविवाहितच रहातात. शेतात राबण्यापलिकडे मुलींच्या जीवनाला काहीच दिशा नसते. गावकऱ्यांच्या उपहासाचा व टवाळीचा त्या विषय बनतात. आयुष्यभर नवऱ्यामुळे त्रासलेली शेकडेकारीन आता मुलींच्या भवितव्याच्या चिंतेने अस्वस्थ झालेली आहे. दिसायला बरी असलेली धाकटी मुलगी एका परधर्मियांबरोबर संसार उभा करु पहाते. शेकडेकारनीला हे पटत नसले तरी आपली एकतरी मुलगी मार्गी लागली याचे तिला समाधान वाटते. पण तिचे समाधानही क्षणिक ठरते. नवऱ्याने सोडून दिलेली धाकटी काही महिन्यातच परत येते या बातमीने कथेचा शेवट होतो. कथेचा हा शेवट शेकडेकारनीच्या आणि तिच्या मुलींच्या दुःखाविषयी बरेच काही सूचवून जातो. शेकडेकारनीची कथा केवळ तिच्या एकटीच्याच दुःखाची कथा उरत नाही, स्त्री जातीच्या जीवनदुःखाची प्रातिनिधिक कहाणी ठरते.

शेकडेकारनीच्या कथेपेक्षा 'थोरली' कथेतील थोरलीची जीवनकहाणी अधिक हृदयस्पर्शी आहे. एका परित्यक्ता स्त्रीची ही कथा स्त्रीवरील अन्यायाचे, पुरुषाकडून होणाऱ्या तिच्या वंचनेचे प्रभावी चित्रण करते. लग्नानंतरचे सहा महिने सोडल्यास आयुष्यातील चाळीस वर्षे नवऱ्याच्या सहवासाशिवाय थोरली एकाकीपणे जगलेली आहे. कपाळाला कुंकू लावण्यापुरताच तिचा नवऱ्याशी संबंध. एकाकी परित्यक्ता म्हणून माहेरचा आधारही तिने घेतलेला नाही. माणसापेक्षा जमीन, झाडे, डोंगर, शेती, गुरे-वासरे यांच्याशी नाते जोडून जगते. कायमचा मुंबईवासीय झालेला नवरा आपल्या मृत्युनंतर आपली सगळी संपत्ती, डोंगर-भाट दुसऱ्या बायकोच्या हवाली करतो. थोरलीचे सगळेच भावविश्वच ज्या शेता-भाटांशी, झाडा-पेडांशी, डोंगर-घराशी निगडित झालेले आहे, त्या साऱ्या गोष्टींपासून दूर होण्याच्या कल्पनेनेच थोरलीच्या मनाचा स्फोट होतो. तिचे मानसिक संतुलन ढळते आणि नेहमी अबोल असणारी थोरली सवतीचा उद्धार करीत मांगरातच आपला देह ठेवते. थोरलीचे दुःख नवऱ्याने अन्याय केलेल्या एका स्त्रीचे दुःख जसे आहे त्याचप्रमाणे आपल्या जगण्याची मुळे मातीशी जोडून जगणाऱ्या पण त्याच मातीपासून वंचित व्हावे लागलेल्या स्त्रीचेही दुःख आहे. शेकडेकारीण आणि थोरली यांच्या माध्यमातून पारंपरिक सोशिक भारतीय स्त्रीचे चित्र मिलिंद म्हामल यांनी आपल्या कथेतून उभे केलेले आहे. या दोन स्त्री-व्यक्तिरेखांपेक्षा 'सोबती' कथेतीव सुषमा वेगळी आहे. कॅन्सरचा असाध्य आजार

जडल्याने आपण आपल्या पतीला फार दिवस सोबत देऊ शकत नाही म्हणून स्वतःच पतीसाठी वधूसंशोधन करणारी-समाजात सामान्यतः अपवादानेच दिसणारी - स्त्री सुषमाच्या रुपाने दिसते. सुषमाच्या पतीशी आणि मुलांशी आत्मीयतेने समरस होणारी सुधा सुषमाच्या पतीला (समीरला) सोबती म्हणून कशी मिळते हे कथेत सांगितले जाते. त्या निमित्ताने आपल्या भावा-बहिणींचे संसार उभे करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या आणि तरीही भावाच्या घरातून बेघर व्हाव्या लागलेल्या सुधेची जीवनकहाणीही सांगितली जाते. दोन स्त्री-पात्रेच या कथेतील प्रमुख पात्रे असली तरी 'थोरली' किंवा 'शेकडेकारनींचे पांडव' या कथांप्रमाणे स्त्रीच्या दुःखाचे किंवा संघर्षाचे चित्रण करणे हा कथेचा हेतू दिसत नाही. कथेचा शेवट सुषमाच्या मृत्युने होत असला तरी 'सोबती' ही कथा सुखात्म स्वरूपाचीच आहे. पण कथेला सुखात्म रुप देताना कथेत काही कच्चे दुवे राहिलेले दिसतात. काहीशी कृत्रिमताही आलेली दिसते. समीरशी लग्न होण्यापूर्वीच काही महिने सुधेने सुषमाच्या घरी राहण्यास येणे ही घटना ओढून-ताणून आणल्यासारखी वाटते. आपल्या नवऱ्याला आणि मुलांना सुधाची सोबत मिळाल्यानंतर त्यांचे आपल्याकडे दुर्लक्ष होतेय याची जाणीव सुषमाला झाल्याचा फक्त उल्लेख येतो. पण आपल्यादेखतच नवऱ्याच्या जीवनात दुसरी स्त्री आल्यावर कोणत्याही पत्नीच्या मनात जो क्षोभ, जी अस्वस्थता निर्माण होईल त्या अस्वस्थतेचे किंवा मानसिक संघर्षाचे दर्शन कथेत फारसे कुठेच घडत नाही. आपली दुसरी मम्मी म्हणून घरात येऊ पहाणाऱ्या सुधेला सुषमाच्या मुलांनी पहिल्या भेटीतच मम्मा म्हणून बिलगणे हा प्रसंगही कृत्रिम वाटतो. अशा काही कच्च्या दुव्यांमुळे स्त्री-चित्रणात्मक म्हणून 'सोबती' कथा फारशी प्रभावी वाटत नाही.

गोमंतकीय जीवनाच्या आजच्या बदलत्या वास्तवाचे चित्रण मिलिंद म्हामल यांनी 'हवा', 'गोलकारनीचा कुवेटकार' यासारख्या कथांतून समर्थपणे केलेले आहे. मुक्तीनंतरच्या काळात पर्यटन, खाणउद्योग हे गोमंतकीय जीवनाचा एक मोठाच आर्थिक आधार बनलेले आहेत. गोमंतकाची अर्थव्यवस्थाच पर्यटन व्यवसायाशी निगडित झालेली आहे. पर्यटन हे लाखो लोकांच्या उपजिविकेचे आणि अर्थार्जनाचे साधन बनलेले आहे. भारतातील अन्य कोणत्याही पर्यटनस्थळापेक्षा परदेशी गोऱ्या माणसांना गोव्याचे अधिक आकर्षण वाटते. पण या पर्यटनव्यवसायाचे गोव्यावर अनेक भले-बुरे परिणाम झालेले दिसतात. पर्यटनामुळे गोमंतकीय माणसाच्या जीवनावर झालेले परिणाम, पर्यटन व्यवसायाचे वास्तव याचे चित्रण गोमंतकीय मराठी साहित्यातून फार अपवादाने आलेले आहे. पर्यटनव्यवसायातले हे वास्तव म्हामलांच्या 'हवा' या कथेतून प्रभावीपणे आलेले आहे. दहावी नापास होऊन समुद्रकिनाऱ्यावर बेकार म्हणून भटकणाऱ्या योगेशला हिप्पी पर्यटकांच्या सहवासात आर्थिक कमाईचा मार्ग सापडतो. शॅक उभा करण्याची परवानगी मिळवून एडगार-कामिला या जर्मन जोडप्याला

चालवायला दिल्यावर योगेशकडे पैशाचा ओघ वाहू लागतो. ड्रग्जच्या व्यापारातून होणाऱ्या या कमाईमुळे दोन वर्षातच कॉंक्रिटचे घर बांधून जीपमधून फिरु लागतो. एडगर आणि कामिला यांच्यात भांडणे झाल्यावर नेहमीच ड्रग्जच्या नशेत असणारी कामिला योगेशच्या गळ्यात पडते. पण पुढे त्याला शॅक उभारण्यासाठी परवानगी न मिळाल्यामुळे आर्थिक कमाईचा मार्ग बंद होतो. हिप्पीणीबरोबर रहातो म्हणून योगेशला आईची शिवीगाळ ऐकावी लागते. अस्वस्थ झालेला योगेश आपली अस्वस्थता दारू ढोसून विसरू पहातो. पैशाच्या लोभाने दोन नंबरचे धंदे करण्यापेक्षा बापाप्रमाणे गवंडीकाम करुन जगलेले बरे असे त्याला शेवटी वाटायला लागते. पर्यटनव्यवसायातून अपरिहार्यपणे निर्माण होणाऱ्या अशा दोन नंबरच्या आणि अनैतिक व्यवहारात अनेक तरुण अडकलेले दिसतात. त्यांची कहाणी योगेशच्या रूपाने व्यक्त झालेली आहे. पर्यटनाशी संबंधित अनेक बारिक-सारिक तपशील कथेत येतात आणि त्यातून एक पर्यटनकेंद्र म्हणून गोव्याचे जिवंत चित्र उभे रहाते.

भरपूर कमाईचा मार्ग बंद पडल्यावर योगेशच्या जगण्यातली जशी हवा गेलेली आहे तशीच स्थिती 'गोलकारनीचा कुवेटकार' या कथेतील दिनाची आणि गोलकारणीची झालेली आहे. अचानक झालेली आर्थिक सुबत्ता सहजपणे पचवणे सामान्य माणसाला अनेकदा कठीण जाते. श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याचीच हौस वाटते. पण आर्थिक सुबत्ता घसरली की बदलत्या परिस्थितीला तोंड देणे त्यांना कठीण जाते. याच सत्याचे दर्शन 'गोलकारनीचा कुवेटकार' या कथेतून घडते. गोव्यातले अनेक लोंक अर्थार्जनासाठी दुबई, कुवेतसारख्या आखाती देशात जात असतात. काहीजण तर जास्तीतजास्त पैसा कसा मिळवता येईल या आशेने आखातीदेशात जाण्यासाठी धडपडत असतात. गोलकारनीचा दिनाही सरकारी ऑफिसातली प्यूनची नोकरी सोडून लठ्ठ पगार मिळवण्यासाठी कुवतला गेलेला आहे. दिनाच्या कमाईमुळे गोलकारनीच्या कुटुंबावर श्रीमंतीचा रंग कसा चढू लागतो याचे अनेक तपशीलांतून चित्रण केलेले आहे. नव्याने आलेल्या या श्रीमंतीमुळे गोलकारनीला शेत कसायचीही गरज वाटत नाही. कुटुंबियांच्या वागण्या-बोलण्यातून हा श्रीमंतीचा थाट झळकू लागतो. पण कुवेतमध्ये युद्ध सुरु झाल्यावर दिनाची नोकरी संपते. रिकाम्या हाताने पळ काढावा लागतो. मग आर्थिक सुबत्तेचे रंग उतरून दिनाची आणि गोलकारनीच्या कुटुंबाची काय स्थिती होती हे कथेत सांगितले जाते. आजचे माणसाचे जगणे अर्थकेंद्रीत झालेले आहे. चांगले आणि प्रतिष्ठित जगण्याची कल्पना आर्थिक सुबत्तेशी आणि भौतिक साधनांशी निगडित झालेली आहे. आजच्या काळातील या जीवनसत्याचे दर्शन दिनाची ही कथा वाचकांना घडविते.

झपाट्याने होणारे शहरीकरण ही आजच्या अर्थकेंद्रीत जीवनव्यवस्थेचीच फलनिष्पत्ति आहे. नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने शहराकडे धावणारा ग्रामीण माणूस

शहरी पांढरपेशा होऊ लागलेला आहे. शहरी जीवनपद्धती स्वीकारुन गावाकडच्या आपल्या मातीला, आपल्या देशी संस्कारांना विसरून भूमीपासून तुटलेले अनेक दिसतात. पण मनाने गावच्या भूमीतच पाळेमुळे रुजवून राहिलेल्या देशी माणसाची शहरीपद्धतीचे जीवन जगताना कशी ओढाताण होते याचे दर्शन म्हामल यांनी 'ओढ' या कथेतून फार सुंदरपणे घडविले आहे. गावाकडच्या रामाला पणजीच्या सरकारी कार्यालयात प्यूनची नोकरी मिळते आणि स्वतःच्या मनाविरुद्ध त्याला शहरी, मध्यमवर्गीय जीवन स्विकारणे भाग पडते. लग्नानंतर त्याची बायको भौतिक समृद्धीच्या दिशेने त्याला ओढत नेते. फ्लॅट, मिक्सर, फ्रीज, टी. व्ही., वॉशिंग मशीन, गीझर, मोबाईल, इंटरनेट, संगणक, मोटारसायकल या गोष्टींनी वेढलेल्या तथाकथित आधुनिक जीवनाला सामोरे जाताना त्याची देशी मानसिकता गावाची ओढ लावीतच रहाते. फ्लॅटमध्ये आपल्या खोलीत फॅनखाली झोपताना गावच्या मोकळ्या हवेची रामाला आठवण येत रहाते. शेवटी मोठी झालेली मुले मार्गी लागल्यावर स्वेच्छानिवृत्ती घेऊन गावातच रहायचे तो ठरवतो. शेतीत राबून भाजीपाला पिकवायची इच्छा त्याच्या शेतकरी मनाचे दर्शन घडविते. शहर सोडल्यावर गावाकडे मोकळा श्वास तरी घेता येईल असे समाधान रामाला वाटते. अशाप्रकारे पारंपरिक ग्रामीण जीवन आणि आधुनिकता यातील तणावाचे प्रभावी चित्रण म्हामल यांनी या कथेतून केलेले आहे. सध्या मराठीमध्ये देशीवादी साहित्यसिद्धांत हा चर्चेचा महत्त्वाचा विषय बनलेला आहे. साहित्याचा देशीवादी दृष्टिकोणातून विचार करणाऱ्या समीक्षकांना देशीवादी जाणीवेचे प्रत्यंतर 'ओढ' कथेतून उत्तमप्रकारे येऊ शकेल.

'चतुर्थी' संग्रहातील इतर कथांपैकी 'अभिमानी' ही कथा व्यक्तिचित्रणात्मक आहे. नाईक जमातीविषयी अभिमान असणारा, नाईकांना फसविणाऱ्या बामण-देशप्रभूंविषयी चीड असणारा, कट्टर मराठीवादी आणि क्रिकेटमध्येही रस असणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा भिका नाईक लेखकाला आपल्या कथेचा विषय करावासा वाटतो यातून लेखकाच्या दृष्टिचाही परिचय होतो. 'नरकासूर' ही कथा सकृत्‌दर्शनी नरकासूर-दहन या घटनेभोवती केंद्रींत झालेली दिसत असली तरी बलदंड, स्वाभिमानी नरसू आणि गावकऱ्यांनी त्याच्यावर घातलेला बहिष्कार हा या कथेच्या आशयाचा मुख्य भाग झालेला आहे. या कथेचा कथावकाश बराच विस्तृत आहे. ग्रामीण समाजजीवनाचे, ग्रामीण माणसांच्या सामूहिक जाणीवेचे, परंपराचे दर्शन ही कथा घडविते. रात्रीच्या वेळी नरसूचा मृत्यु होणे या प्रसंगाची वातावरणनिर्मितीही लेखकाने उत्तम प्रकारे केलेली आहे. 'जाळं' या कथेत नायकाच्या प्रेमभंगाचे वर्णन आहे पण प्रेमकथेचे सांकेतिक स्वरूप तिला येत नाही, कारण कथेच्या आशयाचा बराचसा भाग लाकूड गिरणीत काम करणाऱ्या मेस्त्रीच्या हकिगतीनेच व्यापला जातो. या एकमेव कथेचा अपवाद वगळल्यास प्रणयानुभव हे म्हामलांच्या कोणत्याच कथेचे

आशयसूत्र बनलेले नाही. त्यांच्या कथालेखनाचे हे एक खास वैशिष्ट्य म्हणून सांगावे लागेल. एक लेखक म्हणून त्यांची दृष्टी रोमँटिक किंवा प्रेमानुभवात रमणारी नाही याचेच हे प्रत्यंतर आहे. 'हावरट' या कथेचे आशयसूत्र तकलूपी असल्याने ती जीवनदर्शनात्मकही वाटत नाही. नानांनी गल्लीतल्या मुलांना लग्नातील जेवणासाठी आवर्जून बोलावणे ही कथेतली मुख्य घटना या कथेतून दिसणाऱ्या नानांच्या स्वभावाशी विसंगत म्हणून कृत्रिम वाटते.त्यामुळे कथा फारसा परिणाम साधत नाही.

मिलिंद म्हामल यांच्या या कथा वाचल्यावर एक गोष्ट ठळकपणे लक्षात येते. त्यांच्या अनेक कथांचा आशय 'कथा' या वाङ्मयप्रकाराच्या मर्यादित अवकाशात बसणारा नाही. तो अधिक व्यापक व विस्तृत असूनही कथेच्या मर्यादेत बसविण्याचा प्रयत्न केल्याने तो कलानुभव म्हणून फारसा विकसित झालेला नाही. त्यामुळे अनेक कथा बीजभूत कादंबऱ्याच आहेत असे म्हणावे लागते. या दृष्टिने 'हवा', 'चतुर्थी' किंवा 'गोलकारनीचा कुवेटकार' या कथांचा आवर्जून निर्देश करावा लागेल. 'ओढ' या कथेने तर तीस-पस्तीस वर्षांचा विस्तृत कालपट व्यापलेला आहे. एवढ्या वर्षांत रामा प्यूनच्या जीवनाचे शहरीकरण कसे झाले ते सांगताना केवळ हकिगत सांगणाच्या पद्धतीने ते उरकून घ्यावे लागते. खरे तर या आशयाची मागणी कादंबरीसारख्या विस्तृत वाङ्मयप्रकाराची आहे हे तीव्रतेने जाणवते. 'हवा' ही कथाही अशा वृत्तांतकथन पद्धतीनेच उरकून घेतलेली दिसते.

व्यापक आशयद्रव्य कथेच्या मर्यादित अवकाशात बसवले गेल्याने म्हामल यांच्या वरीलसारख्या अनेक कथा तीव्र किंवा टोकदार परिणाम साधण्यातही यशस्वी ठरत नाहीत. तीव्र संवेदन देऊन एकात्म परिणाम साधणे हे कथा या प्रकाराचे वैशिष्ट्य म्हणून सांगितले जाते. पण लेखकाला या कथेतून नेमके काय सांगायचे आहे किंवा नेमका परिणाम काय साधायचा आहे असा संभ्रम म्हामलांच्या अनेक कथा वाचताना निर्माण होतो. किंवा लेखकाला कथेतून जे सांगायचे आहे त्याच्याइतकेच दुसऱ्या आशयकेंद्रालाही कथेत महत्त्व मिळाल्याचे दिसते. उदा. 'नरकासूर' या शीर्षकानुसार नरकासूर-दहन हे कथेचे केंद्र असायला पाहिजे. पण नरसू आणि त्याच्यावरील सामाजिक बहिष्कार ही गोष्टही कथेत महत्त्वाची ठरते. 'गोलकारनीचा कुवेटकार' हे शीर्षकही अशा एककेंद्रीततेच्या अभावाचे सूचक ठरते. ही कथा गोलकारनीची की कुवेटकाराची असा प्रश्न निर्माण होतोच. 'जाळं' या कथेचे आशयसूत्रही एककेंद्री वाटत नाही. अर्थात् अनेकसंदर्भसूचकता किंवा बहुपरिणत्मकता ही साहित्यकृतीच्या गुणवत्तेची सूचक असली तरी कथेच्या एकात्मतेला किंवा एककेंद्रीत्वाला त्यामुळे धक्का पोहोचू नये अशी अपेक्षा करणे चूक ठरत नाही.

म्हामल यांच्या कथा सामान्य माणसाच्या सुख-दुःखाच्या आणि संघर्षाच्या कथा असल्या तरी एक लेखक म्हणून त्यांची दृष्टी व्यक्तिवादी नाही. मराठीतल्या

अनेक लेखकांप्रमाणे त्यांची दृष्टी रोमँटिकही नाही. त्यांच्या कथांना अपरिहार्यपणे सामाजिक संदर्भ असतोच. त्यामुळे कथा विशिष्ट व्यक्ती किंवा विशिष्ट घटनेशी निगडित असली तरी गोमंतकीय समाजजीवनाचे चित्र उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कथेमध्ये असते. व्यक्तिवादी आशयसूत्रांपासून जशी त्यांची कथा दूर आहे त्याचप्रमाणे रचनेचे किंवा कथनतंत्राचे प्रयोग करण्याचीही त्यांच्या कथेला गरज वाटत नाही. त्यांच्या बहुतांश कथा आत्मनिवेदनात्मक पद्धतीने सांगितल्या गेलेल्या असल्या तरी कथेतून जीवनवास्तवाचे चित्रण तटस्थपणेच झालेले दिसते. कथेचे निवेदन करणारे पात्र कथाविश्वाचाच भाग असले तरी ते कथाविश्वाच्या केन्द्रस्थानी कधीच नसते. त्यामुळेच जीवनचित्रणातली ही तटस्थता साधली जाते. रचनेच्या दृष्टीने 'गोलकारनीचा कुवेटकार' यासारखी कथा वैशिष्ट्यपूर्ण वाटते. कामेऱ्यांच्या आपापसातील गप्पांतून गोलकारीण आणि तिच्या कुटुंबाचा परिचय कथेच्या प्रारंभी वाचकांना करून दिला जातो. नंतर तटस्थ निवेदनातून बहुतांश कथा सांगून कामेऱ्यांच्या गप्पांतूनच कथेचा शेवटही केला जातो. असेच तंत्र 'शेकडेकारनीचे पांडव' या कथेतही वापरलेले आहे. प्रसंगवर्णनाने सुरू होणारे 'हवा', 'नरकासुर' या कथांचे प्रारंभ आकर्षक वाटतात, तर थोरलीच्या मनाचा उद्रेक दाखविणारा 'थोरली' या कथेचा शेवट प्रभावी वाटतो. 'चतुर्थी', 'हावरट' या कथांचे शेवट अनपेक्षित धक्का-तंत्राने केलेल आहेत, तर 'जाळं' या कथेचा शेवट सूचक व प्रतीकात्मक वाटतो.

कथा सांगण्याची भाषा सरळ, साधी, वास्तवदर्शी असल्याने शैलीदारपणाने लक्ष वेधून घेणारी अशी नाही ही या कथेची एक जमची बाजू म्हणून सांगावी लागेल. संवादासाठी पात्रांच्या बोलीभाषेचा सहजपणे केलेला वापर वास्तववादी शैलीचा अभिन्न भाग वाटतो. पण लेखकाच्या या साध्या, वास्तवदर्शी भाषेला आशयगर्भतेचे व चिंतनशीलतेचे परिमाण यापुढे लाभेल अशी आशा व्यक्त करायला हरकत नाही. मिलिंद म्हामल यांच्या कथालेखनामध्ये कसलेल्या लेखकाचा सफाईदारपणा व कुशलता नसली तरी वास्तव जीवनदर्शन, सामाजिकता, देशीयता या दृष्टीने 'चतुर्थी', 'हवा', 'ओढ', 'थोरली', 'गोलकारनीचा कुवेटकार', 'नरकासुर' या म्हामलांच्या कथांनी गोमंतकीय व एकूणच मराठी कथासाहित्यात काही भर घातलेली आहे असे म्हणता येईल. त्यांची विशिष्ट जीवनदृष्टी त्यांच्या कथालेखनातून जाणवतेच, पण त्यांचे जीवनाचे आकलन अधिक प्रगल्भ होऊन त्यांच्या कथेला याहून अधिक उंचीवर जाता येईल असे निश्चितपणे वाटते.

**डॉ. वासुदेव सावंत**
मराठी विभाग प्रमुख
गोवा विद्यापीठ

❑ ❑ ❑